समरी फौजदारी केस नंबर ७२०/२०२६
निशाणी क्रमांक / सी

(फौजदारी प्रक्रिया संहितेच्या १९७३ चा अधिनियम दोन प्रकरण वीस संक्षिप्त संपरीक्षा केलेल्या खटल्याचा अभिलेख)

(ए.आर.कुलकर्णी प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालय क्र- ४ यांचे न्यायालयात)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अपराध घडल्याची तारीख | : | १४/०२/२०२६ |
| २. | फिर्याद दाखल झाल्याची तारीख | : | १४/०२/२०२६ |
| ३. | फिर्यादीचे नांव व पत्ता | : | महाराष्ट्र शासन |
| ४. | आरोपीचे नांव व पत्ता | : | किसन दत्तात्रय खाडे,<br>व.व. ४६, धंदा - पानशॉप,<br>रा. जवाहरनगर, इचलकरंजी. |
| ५. | गुन्हयाचे कलम | : | सिगारेट ॲण्ड टोबॅको कायद्याचे कलम २० प्रमाणे |

६. ज्याबद्दल फिर्याद दिली आणि जो अपराध आरोपींना समजावून सांगण्यात आला त्या अपराधाचा तपशील.

तुम्ही दिनांक १४/०२/२०२६ रोजी जवाहरनगर, इचलकरंजी येथे तुम्हीं स्वत:चे फायद्याकरीता तुमचे पान टपरीमध्ये अवैद्यरित्या सुपारी, तंबाखू व वेगवेगळया पत्यांचे मिश्रणापासून बनविलेला अवैध मावा त्यास कोणतेही लेबल न लावता अथवा त्याचेवर सुरक्षेबाबतचा कोणताही वैधानिक इशारा लिहिलेला नसताना विक्री करत असताना मिळून आलेने तुम्ही सिगारेट ॲण्ड टोबॅको कायद्याचे कलम २० प्रमाणे गुन्हा केला आहे.

७. आरोपीचे प्रथिकथन.

प्रश्न १ - तुम्हाला पोलिस पेपर्सच्या नकला मिळाल्या काय ?
उत्तर. - होय.
प्रश्न २ - तुम्हाला आता तुमचेवरचा दोषारोप मराठीतून समजावून सांगितला तो समजला काय ?
उत्तर - होय.
प्रश्न ३ - तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ?
उत्तर - होय, मला गुन्हा कबूल आहे.

समोर,

दिनांकः-  १४/०३/२०२६

सही/-
( ए. आर. कुलकर्णी )
०४ थे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

आरोपीची सही.                                  लोक अदालत पॅनल क्र. ४, इचलकरंजी.

आरोपीने स्वतःहून अर्ज देवून गुन्हा कबूल केला आहे. आरोपीने कमीत कमी दंड करणेची विनंती केलेली आहे.

आरोपीचे म्हणणे ऐकले. आरोपीने सदरचा गुन्हा केल्याचे मान्य करुन कमीत कमी दंडाची शिक्षा करण्याची विनंती केली आहे. गुन्हयाचे स्वरुप आणि आरोपीचे कबूलीचे कथन यांचा विचार करता आरोपीला द्रव्यदंडाची शिक्षा देणे न्यायोचित होईल.  करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

आ दे श

आरोपी किसन दत्तात्रय खाडे यास फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५२ नुसार सिगारेट ॲण्ड टोबॅको कायद्याचे कलम २० प्रमाणे अंतर्गत दोषी ठरविणेत येत असून, आरोपी यांना गुन्हयासाठी रक्कम रुपये ५००/- (रुपये पाचशे फक्त) मात्र द्रव्यदंड जमा करावा अशी शिक्षा सुनावण्यात येत आहे. द्रव्यदंड जमा न केलेस आरोपीस ०४ दिवस साधी कैद सुनावण्यात येत आहे.

समोर,

सही/-

दिनांकः-  १४/०३/२०२६                    ( ए. आर. कुलकर्णी )
०४ थे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
लोक अदालत पॅनल क्र. ४, इचलकरंजी.

दिनांकः-  १४/०३/२०२६                    पॅनल सदस्य,
लोक अदालत पॅनल क्र. ४, इचलकरंजी.